आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१९ मे २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कृषी कर्जासाठी शेतकऱ्यांना सिबिलची अट न घालता कर्जपुरवठा करण्याची मुख्यमंत्र्यांची बँकांना ताकीद /वित्तीय वर्ष २०२५-२६ साठी राज्याचा ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटी रुपयांचा पतपुरवठा आराखडा मंजूर

- खरीप पिकासाठी शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत देण्याची कृषिमंत्र्यांची ग्वाही

- मुंबई-गोवा महामार्गावर झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू

**आणि**

- राज्यात येत्या रविवारपर्यंत जोरदार पावसाचा इशारा

**<><><><><>**

कृषी कर्जासाठी शेतकऱ्यांना सिबिलची अट न घालता कर्जपुरवठा करा, अशी ताकीद मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बँकांना दिली आहे. ते आज मुंबईत राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या १६७ व्या बैठकीत बोलत होते. यावेळी राज्याचा २०२५-२६ या वित्तीय वर्षाचा ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटी रुपयांचा पतपुरवठा आराखडाही मंजूर करण्यात आला. शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही तर त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेसोबतच शेतकरी आत्महत्यांमध्ये होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना सीबिल मागू नका, हे वारंवार सांगितलं, तरी बँका सिबिल मागतात. त्यावर आजच्या बैठकीतच तातडीनं तोडगा सांगा. यापूर्वी अशा बँकावर शासनाने एफआयआर पण केले आहेत. रिझर्व्ह बँकेने सुद्धा कृषी कर्जाबाबत स्पष्टता दिली आहे. जर एखादी बँक शाखा सिबिल मागत असेल तर त्या शाखेवर कारवाई करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घ्यावा, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्र्यांनी बँकांना तंबी दिली. कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी विशेष प्रयत्न करून यंदा दिलेलं उद्दिष्ट पूर्ण करावं, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते महामुंबई क्षेत्रातही कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा, या क्षेत्रात विकासाच्या मोठ्या संधी आहेत, असं शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

यंदा चांगला पावसाळा होईल असा अंदाज आहे, त्यामुळे खरीप पिकासाठी शेतकऱ्यांना शासनामार्फत आवश्यक ती मदत दिली जाईल, अशी ग्वाही कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. ते आज नाशिक जिल्ह्याच्या खरीप हंगामपूर्व बैठकीत बोलत होते. खत विक्रेत्यांनी कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक केली तर खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा कोकाटे यांनी दिला.

**नाशिक** जिल्ह्यात यंदा ६ लाख ४४ हजार हेक्टर क्षेत्र खरिपाच्या लागवडीसाठी प्रस्तावित आहे. त्या संदर्भात कोकाटे यांनी आढावा घेतला. यावेळी कृषी योजनांच्या माहितीचा समावेश असलेल्या घडी पुस्तिकेचं प्रकाशन, तसंच व्हाट्सअप चॅनल चा उद्घाटनही कोकटे यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या २९ मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरु होणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान  यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या  ७२३ जिल्ह्यांमधे ही मोहीम राबवली जाणार असून सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे. सुमारे ६५ हजार गावात जाऊन वैज्ञानिकांचं पथक शेतकऱ्यांना यासंदर्भात प्रात्यक्षिकं आणि प्रशिक्षण देईल. जिल्हा पातळीवर या पथकाच्या दररोज तीन बैठका होतील, असं त्यांनी सांगितलं. शेती क्षेत्रामुळे सुमारे निम्म्या लोकसंख्येला रोजगार मिळतो, आणि अन्नसुरक्षेचा पाया घातला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या  विकसित भारताच्या संकल्पनेत, ‘विकसित कृषी- समृद्ध किसान’

असं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. २०२३-२०२४ या वर्षात एकूण अन्नधान्य उत्पादन ५५७ लाख टन झालं ते २०२४ -२५ या वर्षात एक हजार ६६४ लाख टनांपर्यंत गेल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मन की बात या कार्यक्रमाद्वारे येत्या २५ मे रोजी देशविदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२२ वा भाग असेल. श्रोते या कार्यक्रमासाठी सूचना १ ८ ० ० १ १ ७ ८ ० ० या टोल फ्री क्रमांकावर पाठवू शकता. तसंच नरेंद्र मोदी ॲप आणि माय गव्ह ॲपद्वारेही आपल्या सूचना २३ मे पर्यंत पाठवता येतील.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. **रायगड जिल्ह्यात पनवेल** इथं, तर **ठाणे शहरात** कोर्टनाका इथून तिरंगा रॅली काढली होती. **लातूर जिल्ह्यात**ही ऑपरेशन सिंदूर’च्या यशाबद्दल भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तिरंगा यात्रा काढली होती. यात्रेत माजी सैनिकांसह मोठ्या संख्येनं नागरिक सहभागी झाले होते. लातूर जिल्ह्यातल्या सर्वसामान्य नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकू या…

**होल्ड…. बाईट**

**धुळे शहरात आणि शिरपूर** इथं, **जळगाव जिल्ह्यात** भुसावळ शहरात, **यवतमाळ** जिल्ह्यात पुसद इथं तिरंगा रॅली निघाली होती.

**कोल्हापुरातले** माजी सेनाधिकारी कर्नल अमरसिंह सावंत यांनी ऑपरेशन सिंदुर बाबत प्रतिक्रिया देताना सांगितलं….

**होल्ड बाईट…( २२ सेकंद)**

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. मुंबईहून देवरुखला जाणारी कार चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे रत्नागिरीजवळ जगबुडी नदीत कोसळली. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

<><><><><>

राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग अधिक गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी आरोग्य धोरणाबाबतचा प्रस्ताव तातडीनं सादर करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज दिले. मुंबईत आरोग्य भवन इथं उच्चस्तरीय बैठक झाली. कंत्राटी कर्मचाऱ्यांचा शासन सेवेत समावेश करण्याचा, त्यांच्या वेतन वाढीचा, तसंच स्वच्छता आणि आरोग्यदायी अभियान ही योजना सुरू करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करावा, १७ ठिकाणी कॅन्सर डे केअर सेंटर सुरू करावं, क्षयरोगमुक्त पंचायत आणि तंबाखूमुक्त शाळा अभियान सुरू करावं, अशा सूचनाही आबिटकर यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

<><><><><>

आशियाई क्रिकेट स्पर्धेतल्या सहभागाशी संबंधित कोणत्याही मुद्यावर कोणत्याही पातळीवर चर्चाच झालेली नाही, असं बीसीसीआय़ अर्थात भारतीय नियामक मंडळाचे सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केलं आहे. आशियाई चषक महिला आणि पुरुषांच्या स्पर्धांमधून बाहरे पडण्याचा निर्णय बीसीसीआयनं आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीला कळवला असल्याच्या बातम्या याआधी पुढं आल्या होत्या. त्या सर्व निव्वळ तर्क आणि काल्पनिक असल्याचं सैकिया यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयानं शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचं

वेळापत्रक जाहीर केलं आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्याचा सराव करण्यासाठी नोंदणी आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची संधी मिळेल. २० मे रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हे सराव अर्ज उपलब्ध असतील. प्रवेशासाठी अंतिम अर्ज २१ मे ते २८ मे या कालावधीत भरता येतील. विद्यार्थी कमीतकमी १ आणि जास्तीतजास्त १० महाविद्यालयांच्या नावाचा पसंतीक्रम देऊ शकतात. तात्पुरती गुणवत्ता यादी ३० मे रोजी प्रसिद्ध केली जाईल. काही आक्षेप असल्यास विद्यार्थी १ जून पर्यंत तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार दाखल करू शकतात. अंतिम गुणवत्ता यादी ३ जून रोजी प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती संचालनालयानं दिली आहे.

<><><><><>

राज्यात अवकाळी पाऊस पडत आहे. मराठवाड्यातही अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडत आहे. गेल्या चोवीस तासांत वीज पडून तिघाजणांचा मृत्यू झाला आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. राज्यात आजपासून येत्या रविवारी २५ मे पर्यंत जोरदार पावसाचा इशारा मुंबई प्रादेशिक हवामान विभागानं दिला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात येत्या २१ तारखेपर्यंत सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//